इस पुस्तिका में **20** मुद्रित पृष्ठ हैं।
This Booklet contains **20** printed pages.

# MVD18—II

परीक्षा पुस्तिका संख्या
Test Booklet No.

LANG. CODE
**11**

## प्रश्न-पत्र—II / PAPER—II
## मराठी भाषा परिशिष्ट / MARATHI LANGUAGE SUPPLEMENT
## भाग IV & V / PART IV & V

परीक्षा पुस्तिका संकेत
**Test Booklet Code**

**M**

**इस परीक्षा पुस्तिका को तब तक न खोलें जब तक कहा न जाए।**
**Do not open this Test Booklet until you are asked to do so.**
**इस परीक्षा पुस्तिका के पिछले आवरण (पृष्ठ संख्या 20) पर दिए गए निर्देशों को ध्यान से पढ़ें।**
**Read carefully the Instructions on the Back Cover (Page No. 20) of this Test Booklet.**

**मराठी में निर्देशों के लिए इस पुस्तिका के पृष्ठ संख्या 2 व 19 देखें।**
**For Instructions in Marathi, see Page Nos. 2 and 19 of this Booklet.**

### *परीक्षार्थियों के लिए निर्देश :*

1. यह पुस्तिका मुख्य परीक्षा पुस्तिका का एक परिशिष्ट है, उन परीक्षार्थियों के लिए जो **या** तो भाग—IV (भाषा—I) **या** भाग—V (भाषा—II) **मराठी** भाषा में देना चाहते हैं, लेकिन **दोनों नहीं**।
2. परीक्षार्थी भाग I, II, III के उत्तर मुख्य परीक्षा पुस्तिका से दें और भाग IV व V के उत्तर उनके द्वारा चुनी भाषाओं से।
3. अंग्रेजी व हिन्दी भाषा पर प्रश्न मुख्य परीक्षा पुस्तिका में भाग—IV व भाग—V के अन्तर्गत दिए गए हैं। भाषा परिशिष्टों को आप अलग से माँग सकते हैं।
4. इस पृष्ठ पर विवरण अंकित करने एवं उत्तर-पत्र पर निशान लगाने के लिए **केवल काले/नीले बॉलपॉइंट पेन** का प्रयोग करें।
5. इस भाषा पुस्तिका का **संकेत M** है। यह सुनिश्चित कर लें कि इस भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका का संकेत, उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** एवं मुख्य परीक्षा पुस्तिका पर छपे संकेत से मिलता है। अगर यह भिन्न हो, तो परीक्षार्थी दूसरी भाषा परिशिष्ट परीक्षा पुस्तिका लेने के लिए निरीक्षक को तुरन्त अवगत कराएँ।
6. इस परीक्षा पुस्तिका में **दो** भाग IV और V हैं, जिनमें **60** वस्तुनिष्ठ प्रश्न हैं तथा प्रत्येक 1 अंक का है :

   भाग—IV : भाषा—I (मराठी) (प्रश्न सं० 91–120)
   भाग—V : भाषा—II (मराठी) (प्रश्न सं० 121–150)
7. भाग—IV में भाषा—I के लिए 30 प्रश्न और भाग—V में भाषा—II के लिए 30 प्रश्न दिए गए हैं। इस परीक्षा पुस्तिका में केवल मराठी भाषा से सम्बन्धित प्रश्न दिए गए हैं। **यदि भाषा—I और/या भाषा—II में आपके द्वारा चुनी गई भाषा(एँ) मराठी के अलावा है/हैं, तो कृपया उस भाषा वाली परीक्षा पुस्तिका माँग लें। जिन भाषाओं के प्रश्नों के उत्तर आप दे रहे हैं वह आवेदन-पत्र में चुनी गई भाषाओं से अवश्य मेल खानी चाहिए।**
8. **परीक्षार्थी भाग—V (भाषा—II) के लिए, भाषा सूची से ऐसी भाषा चुनें जो उनके द्वारा भाषा—I (भाग—IV) में चुनी गई भाषा से भिन्न हो।**
9. रफ़ कार्य परीक्षा पुस्तिका में इस प्रयोजन के लिए दी गई खाली जगह पर ही करें।
10. सभी उत्तर केवल OMR उत्तर-पत्र पर ही अंकित करें। अपने उत्तर ध्यानपूर्वक अंकित करें। उत्तर बदलने हेतु श्वेत रंजक का प्रयोग निषिद्ध है।

### *Instructions for Candidates :*

1. This Booklet is a Supplement to the Main Test Booklet for those candidates who wish to answer **EITHER** Part—IV (Language—I) **OR** Part—V (Language—II) in **MARATHI** language, but **NOT BOTH**.
2. Candidates are required to answer Parts I, II, III from the Main Test Booklet and Parts IV and V from the languages chosen by them.
3. Questions on English and Hindi languages for Part—IV and Part—V have been given in the Main Test Booklet. Language Supplements can be asked for separately.
4. Use **Black/Blue Ballpoint Pen only** for writing particulars on this page/marking responses in the Answer Sheet.
5. The CODE for this Language Booklet is **M**. Make sure that the CODE printed on **Side-2** of the Answer Sheet and on your Main Test Booklet is the same as that on this Language Supplement Test Booklet. In case of discrepancy, the candidate should immediately report the matter to the Invigilator for replacement of the Language Supplement Test Booklet.
6. This Test Booklet has **Two** Parts, IV and V, consisting of **60** Objective-type Questions and each carrying 1 mark :

   Part—IV : Language—I (Marathi) (Q. Nos. 91–120)
   Part—V : Language—II (Marathi) (Q. Nos. 121–150)
7. Part—IV contains 30 questions for Language—I and Part—V contains 30 questions for Language—II. In this Test Booklet, only questions pertaining to Marathi Language have been given. **In case, the language(s) you have opted for as Language—I and/or Language—II is a language other than Marathi, please ask for a Test Booklet that contains questions on that language. The languages being answered must tally with the languages opted for in your Application Form.**
8. **Candidates are required to attempt questions in Part—V (Language—II) in a language other than the one chosen as Language—I (Part—IV) from the list of languages.**
9. Rough work should be done only in the space provided in the Test Booklet for the same.
10. The answers are to be recorded on the OMR Answer Sheet only. Mark your responses carefully. No whitener is allowed for changing answers.

परीक्षार्थी का नाम (बड़े अक्षरों में) : ____________________
Name of the Candidate (in Capital letters)

अनुक्रमांक (अंकों में) : ____________________
Roll Number (in figures)

(शब्दों में) : ____________________
(in words)

परीक्षा-केन्द्र (बड़े अक्षरों में) : ____________________
Centre of Examination (in Capital letters)

परीक्षार्थी के हस्ताक्षर : ____________________
Candidate's Signature

निरीक्षक के हस्ताक्षर : ____________________
Invigilator's Signature

Facsimile Signature Stamp of Centre Superintendent ____________________

ही पुस्तिका 20 पानांची आहे.

# MVD18—II

चाचणी पुस्तिका कोड

**M**

LANG. CODE
**11**

## प्रश्नपत्रिका—II

## मराठी भाषा पुरवणी
## भाग IV आणि V

ही पुस्तिका उघडायला सांगेपर्यंत ती उघडू नका.

या पुस्तिकेच्या मलपृष्ठ क्रमांक 19 आणि 20 वरील सूचना काळजीपूर्वक वाचा.

***परीक्षार्थींसाठी सूचना :***

1. ही पुस्तिका मुख्य चाचणी-पुस्तिकेची पुरवणी असून ती अशा परीक्षार्थींकरिता आहे, जे **मराठी** भाषेतील भाग—IV (भाषा—I) **किंवा** भाग—V (भाषा—II) **यांपैकी एकाची** उत्तरे लिहू इच्छितात, **दोन्हींची नव्हे**.
2. परीक्षार्थींनी मुख्य चाचणी-पुस्तिकेतील भाग—I, भाग—II आणि भाग— III सोडवायचा आहे आणि त्यांनी निवडलेल्या भाषेतील भाग—IV आणि V सोडवायचा आहे.
3. भाग—IV आणि V यांमधील इंग्लिश आणि हिन्दी भाषांवरील प्रश्न मुख्य चाचणी-पुस्तिकेत दिलेले आहेत. पुरवण्या स्वतंत्रपणे मागून घेता येतील.
4. या पृष्ठावर माहिती लिहिण्यासाठी/प्रतिक्रिया नोंदवण्यासाठी **केवळ काळे किंवा निळे बॉलपॉइंट पेनच** वापरा.
5. या भाषा पुस्तिकेचे **कोड M** आहे. उत्तर-पत्रिकेच्या **बाजू-2** वर छापलेले कोड आणि या भाषा पुरवणी पुस्तिकेवरील कोड एकच आहे, याची खात्री करून घ्या. जर काही विसंगती असेल तर परीक्षार्थीने ती ताबडतोब पर्यवेक्षकास दाखवावी आणि भाषा पुरवणी पुस्तिका बदलून घ्यावी.
6. या चाचणी-पुस्तिकेत—IV आणि V असे **दोन** भाग आहेत. त्यांमध्ये **60** वस्तुनिष्ठ पद्धतीचे प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास एक गुण आहे :

   भाग—IV : भाषा—I (मराठी) (प्र. सं. 91 ते 120)

   भाग—V : भाषा—II (मराठी) (प्र. सं. 121 ते 150)
7. भाग—IV मध्ये भाषा—I साठी **30** प्रश्न आहेत आणि भाग—V मध्ये भाषा—II साठी **30** प्रश्न आहेत. या चाचणी-पुस्तिकेत केवळ मराठी भाषेशी संबंधित प्रश्न दिलेले आहेत. **जर तुम्ही भाषा—I व/वा भाषा—II साठी निवडलेली भाषा मराठीपेक्षा वेगळी असेल, तर कृपया त्या भाषेवरील प्रश्न असलेल्या चाचणी-पुस्तिकेची मागणी करा. ज्या भाषेची उत्तरे तुम्ही लिहीत आहात ती भाषा आणि तुमच्या अर्जामध्ये निवडलेली भाषा या एकच असल्या पाहिजेत.**
8. **भाग—V (भाषा—II) याकरिता असलेली भाषा ही भाषांच्या यादीमधील निवडलेली भाषा—I (IV भागातील) पेक्षा निराळी असली पाहिजे.**
9. चाचणी-पुस्तिकेमध्ये कच्चा आराखडा करण्यासाठी नेमून दिलेल्या जागेतच तो करावा.
10. OMR उत्तर पृष्ठावरच उत्तरे नोंदवायची आहेत. तुमच्या प्रतिक्रिया काळजीपूर्वक नोंदवा. उत्तरात बदल करण्यासाठी पांढरा रंग (whitener) वापरण्याची परवानगी नाही.

परीक्षार्थीचे नाव : ______________________

अनुक्रमांक (अंकांमध्ये) : ______________________

(शब्दांमध्ये) : ______________________

परीक्षाकेंद्र : ______________________

परीक्षार्थीची सही : ______________ पर्यवेक्षकाची सही : ______________

Facsimile signature stamp of Centre Superintendent ______________________

परीक्षार्थींनी **भाषा–I** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **(प्रश्न क्रमांक 91 ते 120)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part–IV (Q. Nos. 91–120)**, if they have opted **MARATHI** as **Language–I** only.

# Part—IV / भाग—IV

# Language—I / भाषा—I

## Marathi / मराठी

परीक्षार्थींनी **भाषा–I** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–IV** मधील **(प्रश्न क्रमांक 91–120)** यांची उत्तरे द्यावीत.

**91.** कमकुवत विद्यार्थ्यांसाठी भाषा शिक्षणात कोणती कृती सर्वात योग्य आहे?

(1) एकेका विद्यार्थ्याला शिकवणे

(2) गट करुन शिकवणे

(3) जोडीने शिकवणे (Peer teaching)

(4) वरील सर्व

**92.** भाषा शिक्षणाच्या वस्तुनिष्ठ मूल्यमापनासाठी पुढीलपैकी कोणती गोष्ट अनिवार्य असावी?

(1) वस्तुनिष्ठ आणि समीक्षणात्मकता

(2) आकलनात्मक आणि व्यावहारिक

(3) विश्वसनीय आणि वैधता

(4) वरील सर्व

**93.** भाषा शिक्षणात पुढीलपैकी कोणती बाब महत्वाची नाही?

(1) विचारांची अभिव्यक्ती

(2) भाषेची समज

(3) लेखन प्राविण्य

(4) सृजनशीलता

**94.** भाषिक कौशल्याच्या संदर्भात पुढीलपैकी कोणते विधान योग्य नाही?

(1) भाषिक कौशल्य निर्माण करण्यात भाषेच्या सरावापेक्षा भाषेचे नियम अधिक महत्त्वाचे असतात

(2) ऐकणे, बोलणे, वाचणे आणि लिहिणे या क्रमातच मुले भाषा शिकतात

(3) वाचन आणि लेखन यावर शाळेत भर दिला गेला पाहिजे

(4) चारही भाषिक कौशल्ये परस्परांशी संबंधित आहेत

**95.** ''व्याकरण येत नसले तरी मूल ती भाषा लवकर शिकते.'' हे विधान कुणाचे?

(1) महर्षी पतंजली

(2) लॉर्ड स्वीट (Lord Sweet)

(3) लॉर्ड मेकॉले (Lord Macaulay)

(4) जीन पीगेट (Jean Piaget)

**96.** वर्गात शिकवताना विद्यार्थी तुम्हाला कठीण प्रश्न आणि त्यांच्या शंका विचारतात. अशा वेळेस तुम्ही काय कराल?

(1) तुम्ही तयारी करून याल आणि त्यांच्या शंकांचे निरसन कराल आणि प्रश्नांची उत्तरे द्याल

(2) तुम्ही त्यांच्या शंका आणि प्रश्न लिहून घ्याल आणि दुसऱ्या दिवशी त्यांचे समाधान कराल

(3) तुम्ही त्यांना पुस्तक वाचायला सांगाल आणि नंतर त्यावर चर्चा करण्यास सांगाल

(4) वर्गात शिस्त राखण्यासाठी विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षा कराल

**97.** धोकंपट्टीची सवय असल्याने विद्यार्थ्यांचे कोणते नुकसान होते?

(1) त्यांची बुद्धिमत्ता विकसित होत नाही

(2) ते आत्मविश्वास गमावतात

(3) वर्गातील शिक्षणापासून ते जोडले जात नाही

(4) अभ्यासावर त्यांना नीट लक्ष देता येत नाही

**98.** भाषा शिक्षणात आगमनात्मक शिक्षण पद्धतीचा (Inductive Teaching) एक फायदा हा देखील होतो की

(1) विद्यार्थ्यांना गृहपाठ करावा लागत नाही

(2) विद्यार्थ्यांना धोकंपट्टीची सवय लागत नाही

(3) वर्गात कायम शिस्त राहते

(4) विद्यार्थी कमी वेळेत जास्त शिकू शकतात

**99.** पुढीलपैकी कोणता घटक भाषेला अभिव्यक्ती आणि मतप्रदर्शनसाठी एक उत्तम माध्यम बनविण्यात महत्वाचा ठरतो?

(1) प्रसार

(2) संग्रह

(3) विनिमय (आदान-प्रदान)

(4) वरील सर्व

**100.** एका भारतीय मुलाने पुढीलपैकी कोणती गोष्ट शिकली पाहिजे?

(1) मातृभाषा

(2) मातृभाषा आणि प्रादेशिक भाषा

(3) मातृभाषा आणि इंग्रजी

(4) कोणत्याही तीन भाषा

**101.** एका सर्वसमावेशी वर्गात (Inclusive classroom) भाषा शिक्षणात पुढीलपैकी कोणती बाब आव्हान ठरते?

(1) भाषा शिक्षणासाठी योग्य वातावरण निर्मिती न करता येणे

(2) पुरेशी शिक्षण सामग्री नसणे

(3) विद्यार्थ्यांच्या क्षमतेत एकजिनसीपणा नसणे

(4) विद्यार्थ्यांच्या रुचीत असमानता असणे

**102.** मातृभोषच्या शिक्षणात पुढीलपैकी कोणती गोष्ट ज्ञान प्राप्तीचे प्रयोजन नाही?

(1) भाषेच्या घटकांचे पुरेसे ज्ञान

(2) विषयाचे ज्ञान

(3) उच्चारणाचे ज्ञान

(4) भाषेतील वेगवेगळ्या प्रकाराच्या लेखनाचे ज्ञान

**103.** पुढीलपैकी कोणत्या पद्धतीला शिक्षणाचे तंत्र म्हणता येते?

(1) निवड पद्धती

(2) आवड पद्धती

(3) प्रेरणा पद्धती

(4) वरील सर्व

**104.** भाषा शिक्षणात _____ या साठी दृष्यश्राव्य साधन उपयोगी ठरते.

(1) अचूक उच्चारण

(2) अचूक लेखन

(3) अचूक वाचन

(4) वरील कोणतेही नाही

**105.** उपचारात्मक शिक्षण पद्धतीतून _____ हे साध्य होते.

(1) प्रश्न समजून घेण्यात अडचण

(2) प्रश्न सोडवून घेण्यात यश

(3) प्रश्न उलटसुलंट प्रकारे निर्माण होणे

(4) प्रश्नाच्या संदर्भातील भाषिक सिद्धांत समजतात

*सूचना* : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **106** ते **114** या साठी योग्य पर्याय निवडा.

वाचता वाचता कसली तरी चाहूल लागली म्हणून वर पहिलं तो गच्चीच्या कठड्याच्या भिंतीवर एक मोर बसलेला. सुरेख निळा, चमचमता, लांबलचक पिसाऱ्याचा मोर. अवघ्या दहा-पंधरा फूट अंतरावर. सगळं स्वप्नासारखंच वाटू लागलं. या पूर्वी मी मोर असा मोकळा वावरताना पाहिलाच नव्हता. पार्कमधल्या अरुंद, घाणेरड्या पिंजऱ्यात मोर पाहिले होते, पण ते अगदीच दीनवाणे, फिक्कट. इथं वर मोकळं निळंभोर आकाश, मागं संत्र्यांची हिरवीगार बाग आणि समोर हिरवा निळा चमचमता मोर.

मोराचं नि माझं एक विशेष नातं आहे. मी हौस म्हणून स्वतःसाठी भरपूर चित्रं काढतो. दोन तीन वर्षांपूर्वी सहज एकदा मोराचं चित्र काढलं. पुढं झपाटल्या सारख्रा मोराचीच चित्रं काढीत सुटलो. मोर हे माध्यम घेऊन पिसाऱ्याचं रूपानं तऱ्हेतऱ्हेचे आकार त्यात गुंफले. दीडदोन वर्ष झाली तरी तो विषय संपेचना. दुसरं काही काढायचं ठरवून बसायचो आणि कागदाला पेन टेकलं की मोरच काढला जायचा. असं असलं तरी निसर्गात वावरणारा मोर हा पाहिलेलाच नव्हता. इथं तो दिसल्यावर ठरवलं की याला लक्षपूर्वक पाहायचं. पिसारा म्हणजे मोराचा सगळ्यात आकर्षक भाग. पण आता प्रत्यक्ष पाहताना मात्र प्रथम लक्ष गेलं त्याच्या झळाळत्या निळ्या मानकेडे. त्याची मान कशीही वळू शकत होती. तिला कोन नव्हता. सर्व हालचाली वर्तुळाकार. खाली जमिनिवरचं टिपताना मानेचा एक आकार. तर चालताना शरीरावर मागं रेललेला दुसराच आकार. 'एस' या इंग्रजी अक्षराचे विविध आकार ती मान लीलया घेत होती.

या हालचाली होताना मानेवरचा निळा रंग आपल्या विविध छटा दाखवीत होता. हिरवा आणि निळा यांत किती मिश्र छटा दडलेल्या असतात याची एरवी कल्पनाही आली नसती. चोचीच्या मागं डोक्यातून तुरा फुटलेला होता. टणक दिसणाऱ्या डोक्यातून निघणाऱ्या नाजूक-नाजूक तंतूवजा काळ्या रेषा; त्यांच्या टोकाला नाजूक निळी त्रिकोणी पिसं. त्या छोट्या त्रिकोणातही निळ्यातल्या काही छटा.

पिसांचा आकार मोराच्या शरीरावर अनेक ठिकाणी पसरलेला दिसू लागला. मान जिथून सुरू होते त्या तळाशी पिवळ्या किरमिजी रंगाचं डिझाइन होतं. पण त्यातही पिसाचे आकार भरलेल. एकमेकापासून अलग होत जाणाऱ्या दोन गोलाकार रेषा आणि मधे त्यांना सांधणारी तिसरी गोलाकार रेषा. पाठीवरुन पोटावर असे आकार पसरत गेले होते. पिसाऱ्यात तर असे असंख्य आकार. पिसारा म्हणजे रंगाचा खजिनाच होता. अंजिरी रंगावर टरक्वाइज रंगाचे 'डोळे' सगळीकडे चमचमत होते. पिसारा इतका लांबलचक आणि शरीराच्या मानातं अवजड होता तरी मोर तो सावरीत सहजपणे डौलानं वावरत होता.

**106.** पिवळ्या-किरमिजी रंगाचं डिझाइन नेमकं कशावर होतं?

(1) पिसाऱ्यावर
(2) मानेच्या बुडाशी
(3) मोराच्या पायावर
(4) तुऱ्यावर

**107.** लेखकाला सर्वात आकर्षक वाटणारी गोष्ट कोणती?

(1) पिसारा
(2) तुरा
(3) संत्र्याची बाग
(4) चोच

**108.** लेखकाने कोणत्या गोष्टीचे सूक्ष्म निरीक्षण करायचे ठरवले?

(1) काढलेल्या चित्राचं
(2) 'एस' या इंग्रजी अक्षराप्रमाणे वळणाऱ्या मानेचं
(3) निसर्गात वावरणाऱ्या मोराचं
(4) पिसाऱ्यातील असंख्य आकारांचं

**109.** लेखकाने ‘चमचमते’ हे विशेषण कोणत्या घटकासाठी वापरले आहे?

(1) मान

(2) पिसाऱ्यातील डोळे

(3) चोच

(4) तुरा

**110.** उताऱ्यात आलेल्या शब्दांचा योग्यक्रम सुचवा

(1) ओघवत्या गोलाकार, दीनवाणे, टणक, असंख्य आकार, दहा पंधरा फूट

(2) दीनवाणे, टणक, ओघवत्या गोलाकार, दहापंधरा फूट, असंख्य आकार

(3) असंख्य आकार, ओघवत्या गोलाकार, टणक, दीनवाणे, दहा पंधरा फूट

(4) दहा पंधरा फूट, दीनवाणे, टणक, असंख्य आकार, ओघवत्या गोलाकार

**111.** पुढील शब्दांतील ‘नाम’ नसलेला शब्द ओळखा

(1) तुरा

(2) छटा

(3) मोर

(4) पेन

**112.** ‘अवजड’ या शब्दांतून लेखकाला नेमके काय अभिप्रेत आहे?

(1) सहज मानवणारी गोष्ट

(2) सांभाळ करण्यास तुलनेत कठीण

(3) सहज संपणारां विषय

(4) सांभाळ करण्यास प्रमाणात सोपं

**113.** ‘हौस’ या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द शोधा

(1) आवड

(2) रुची

(3) पसंत

(4) आकस

**114.** निळ्या रंगाच्या विविध छटा लेखकाला कशावर दिसल्या?

(1) मानेवर

(2) त्रिकोणी पिसांवर

(3) तुऱ्यावर

(4) आकाशात

*सूचना* **:** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **115** ते **120** या साठी योग्य पर्याय निवडा.

कोट्यावधी जगतात जिवाणू जगती अन् मरती
जशी ती गवताची पाती
नाविक आम्ही परंतु फिरतो सात नभांखाली
निर्मितो नव क्षितिजे पुढती!
मार्ग आमुचा रोधू शकती ना धन ना दारा
घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकुनी खंड खंड सारा!
चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथा या खुळ्या सागराला
अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामराला!

**115.** 'दारा' शब्दाचा समानार्थी शब्द शोधा

(1) दामिनी

(2) यामिनी

(3) भामा

(4) रजनी

**116.** कवितेचा मध्यवर्ती आशय असलेला पर्याय सुचवा

(1) मनातला उत्साह सोडून देऊन मनाप्रमाणे वागणे

(2) मनातली मरगळ टाकून काही तरी विधायक करण्याचा संकल्प घेणे

(3) हातात झेंडे घेऊन हवे तिथे वावरणे

(4) मनाला वाटले तशी कृती करणे

**117.** पुढीलपैकी नाम नसलेला पर्याय सुचवा

(1) नाविक

(2) क्षितिज

(3) खुळा

(4) किनारा

**118.** मानवतेचं प्रतीक कुठे मिरवण्याचा मानस व्यक्त केला आहे?

(1) किनाऱ्यावर

(2) क्षितिजावर

(3) महासागरात

(4) घरावर

**119.** कवीने गवताच्या पातीची तुलना कोणाशी केली आहे?

(1) जिवाणू

(2) सागर

(3) क्षितिज

(4) आकाश

**120.** 'निर्मितो नव क्षितिजे' या वाक्यातून कवीला काय सुचवायचे आहे?

(1) जीवनात वेगवेगळ्या देशांना भेट देणे

(2) क्षितिजा सारखी एखादी कृती तयार करणे

(3) नवनवीन शक्यता पडताळणे

(4) मनस्वीपणे कृती करणे

परीक्षार्थींनी **भाषा–II** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **(प्रश्न क्रमांक 121** ते **150)** यांची उत्तरे द्यावीत.

Candidates should attempt the questions from **Part–V (Q. Nos. 121–150)**, if they have opted **MARATHI** as **Language–II** only.

# Part—V / भाग—V

# Language—II / भाषा—II

# Marathi / मराठी

परीक्षार्थींनी **भाषा–II** यासाठी पर्याय **मराठी** हा निवडला असेल, तरच त्यांनी **भाग–V** मधील **(प्रश्न क्रमांक 121–150)** यांची उत्तरे द्यावीत.

**121.** समावेशी वर्गात (Inclusive class) मुले साधारणपणे कोणत्या बाबतीत चुका करतात?

(1) वाचन

(2) लेखन

(3) बोलणे

(4) वरील सर्व

**122.** ''व्याकरण हे व्यावहारिक आहे आणि सैद्धांतिकही आहे.'' हे विधान तुम्हाला कितपत पटते?

(1) पूर्णतः

(2) अंशतः

(3) पटत नाही

(4) पटते आणि पटत ही नाही

**123.** उच्च प्राथमिक किंवा माध्यमिक पातळीवरच्या मुलांमध्ये भाषेच्या बाबतीत आवड निर्माण होण्यासाठी _____ हे करणे गरजेचे आहे.

(1) विद्यार्थ्यांना पुस्तके वाचण्यास सांगणे

(2) विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त गोष्टी तोंडी सांगणे

(3) विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त लिहायला लावणे

(4) विद्यार्थ्यांच्या व्याकरण क्षमतेत वाढ करणे

**124.** मौखिक सादरीकरणासाठी पुढीलपैकी कोणती पद्धत योग्य नाही?

(1) स्वर प्रस्तुतीकरण (Voice Presentation)

(2) काव्य वाचन (Poetry Recitation)

(3) अमोरा-समोर सांगणे

(4) सांकेतिक भाषेत सांगणे

**125.** "आईच्या दुधा प्रमाणेच मातृभाषा देखील माणसाच्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक आहे." हे विधान कोणाचे?

(1) राजर्षी टंडन

(2) रॉयबर्न (Royburn)

(3) महात्मा गांधी

(4) विवेकानंद

**126.** मुलांना नीट येत नसलेल्या भाषेत शिकवण्याचा प्रयत्न केला तर काय होते?

(1) त्यांना नीट लक्ष देता येणार नाही

(2) विद्यार्थी धोकंपट्टीची किंवा पाठ करून घेण्याची सवय लावून घेतील

(3) विद्यार्थ्यांचे अभ्यासात लक्ष लागत नाही

(4) वरील सर्व

**127.** भाषा आत्मसात करण्याच्या दृष्टीने भाषा शिक्षणात पुढीलपैकी कोणता घटक सर्वात महत्वाचा आहे?

(1) ऐकणे व वाचणे

(2) फक्त ऐकणे

(3) फक्त वाचणे

(4) फक्त लिहीणे

**128.** भाषा शिक्षणात पुढीलपैकी कोणत्या आव्हानाला सामोरे जावे लागते?

(1) कमी वेळेत जास्त ज्ञान देणे

(2) अभ्यास साहित्यातील अवघड मुद्दे समजावणे

(3) विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासाकडे वळवणे

(4) शिक्षकांना शिकविण्यात कमी श्रम पडणे

**129.** "हुशार विद्यार्थ्यांचे उच्चारण आणि शब्दज्ञान (शब्द संग्रह) अधिक चांगले असते." हे विधान कोणाचे?

(1) टर्मन (Terman)

(2) फिशर (Fisher)

(3) थंबा (Thamba)

(4) वरील सर्व

**130.** शब्दाचा अर्थ स्पष्ट करून सांगण्यापेक्षा पुढीलपैकी कोणती कृती करणे योग्य ठरेल?

(1) शब्द समजावून देणे

(2) शब्दकोश पाहायला लावणे

(3) शब्दाचा वाक्यात उपयोग करून विद्यार्थ्यांना अनुमान लावण्यास सांगणे

(4) भाषा शिक्षणाच्या माध्यमातून शब्दाचा अर्थ स्पष्ट करून देणे

**131.** छापील मजकूर न वापरता द्वितीय भाषा शिकण्यासाठी पुढीलपैकी कोणती कृती योग्य ठरेल?

(1) नैसर्गिक दृष्टिकोन

(2) भाषा प्रवाह

(3) व्याकरण अनुवाद पद्धती

(4) परिस्थितीजन्य दृष्टिकोन

**132.** सदोष वाचन करण्याची सवय _____ यामुळे लागते.

(1) बहुभाषिकता

(2) द्विभाषकता

(3) वर्गात जास्त मुले असल्यामुळे

(4) मजकुरावर बोट ठेवून वाचन करण्याची सवय

**133.** शब्दज्ञान पद्धतीच्या (Old method) मदतीने अध्ययन-अध्यापनातील कोणता अडथळा दूर करता येतो?

(1) वाक्य रचनेत शब्दांची क्रमवारी ठरवणे

(2) शुद्ध उच्चारण

(3) मुलांना कोणतीही गोष्ट समजण्यात अडचण येत नाही

(4) वरील सर्व

**134.** पुढीलपैकी कोणती बाब कौशल्य हेतूंशी संबंधित नाही?

(1) वाचन

(2) लेखन

(3) श्रवण

(4) भाषेची आवड

**135.** भाषा विकासात अडथळा निर्माण करणारा घटक

(1) स्वास्थ्य

(2) बुद्धिमत्ता

(3) वैयक्तिक मतभेद

(4) वरील सर्व

*सूचना* : पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **136** ते **143** या साठी योग्य पर्यायाची निवड करा.

संस्कृती म्हणजे समाजजीवनाला प्राप्त झालेले अत्यंत ऊबदार अन् अत्यंत किमती असे एक महावस्त्र आहे. या महावस्त्राची श्रीमंती दिवसेंदिवस वाढत जाणारी असते; त्यापासून मिळणारी ऊब वाढत जाणारी असते; आणि तिची उपयुक्तताही वाढत जाणारी असते. तिच्यामध्ये नानाविध विषयांचे आणि विचारांचे उभे-आडवे धागे गुंफलेले असतात. काठ, पदर, रंग नक्षीकाम, पोत या सर्वांच्या नजाकतीने त्या महावस्त्राला भव्यत्त्व, मोहकत्व आणि सुबकत्व प्राप्त झालेले असते. यातुनच हे संस्कृतीरूपी महावस्त्र व्यक्ती, समाज आणि राष्ट्र यांचे संरक्षण करीत असते. त्यांचे संवर्धन करते. आधारही देते. व्यक्तीच्या भावजीवनाचे भरण-पोषणही करीत असते. म्हणूनच प्रत्येकाला आपला धर्म प्रिय असतो, आपली परंपरा व देवदेवता प्रिय असते, आपली संस्कृती प्रिय असते. प्रत्येक व्यक्तीला भौतिक सुखाबरोबरच मानसिक सुख हवे असते. हे शाश्वत, श्रेष्ठ व मनाला उन्नत करणारे सुख संस्कृतीचे विविध घटक व्यक्तीला पुरवित असतात. आपल्या पापऱ्पुण्याच्या कल्पना कोणत्या, किंवा जीवनातील श्रेयस-प्रेयसाची विभागणी आपण कशी करतो. यावर देखील आपले आंतरिक सुख अवलंबून असते. अन् हे सारे आपल्या संस्कृतीचे पाथेय असते. म्हणून एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारताला भौतिक प्रगतीबरोबर मानसिक रितेपण नको असले; तर त्याला आपल्या संस्कृतीचा सखोल परिचय करून घेणे गरजेचे नि आवश्यक मानले पाहिजे.

संस्कृतीची संकल्पना इतकी बहुआयामी आणि गुंतागुंतीची आहे की तिची काटेकोर नि सर्वसमावेशक व्याख्या करणे कुणालाही शक्य होणारे नाही. संस्कृतीच्या व्याख्यांमध्ये जी विविधता आढळते ती यामुळेच माणसाला निसर्गाने कार्यकारण संबंध लावण्याची अधिक चांगली बुद्धी दिली. भूतकाळाचे स्मरण करणे; अमूर्त तत्त्वांचा शोध घेणे, केलेल्या चुकांची पुनरावृत्ती न करणे, शिवाय सौंदर्य शोधणारी दृष्टी अन् सौंदर्य निर्माण करणारी कल्पकता यांचीही देणगी निसर्गाने मानवाला दिलेली आहे. त्यातूनच निसर्गातील उपलब्ध वस्तूंवर किंवा द्रव्यांवर संस्कार करून त्यांचा उपयोग स्वहितासाठी करून घेणारी सृजनशीलताही त्याला लाभलेली आहे.

माणूस आज गगनचुंबी इमारतीत, ऊबदार घरात अन् उत्कृष्ट वस्त्रप्रावरणांत वावरतो त्याबरोबरच मन, बुद्धी, कल्पकता यांचा चांगला वापर करतो; त्यांच्यावरही संस्कार करतो. या साऱ्यांना स्थूलपणे संस्कृती असे म्हणता येईल. म्हणून धर्म, आध्यात्म, यासह समग्र जीवनाच्या उन्नत अवस्थेचे परंपरेने विकसित होत गेलेले प्रतीक म्हणजे संस्कृती होय.

**136.** लेखकाच्या मते आपले आंतरिक सुख कोणत्या गोष्टीवर अवलंबून असते?

(1) भरण-पोषणावर

(2) श्रेयस-प्रेयसाच्या विभागणीतून

(3) वस्त्रप्रावरणांतून

(4) मानसिक रितेपणातून

**137.** लेखकाच्या मते प्रत्येक माणसाला भौतिक सुखाबरोबरच कोणत्या गोष्टीच गरज असते?

(1) मानसिक सुख

(2) उज्वल स्वप्न

(3) कल्पकता

(4) गगनचुंबी इमारत

**138.** लेखकाला संस्कृतीचा सखोल परिचय कोणत्या कारणास्तव गरजेचा वाटतो?

(1) मानसिक समृद्धीसाठी

(2) भौतिक सुखांसाठी

(3) पारंपारिकतेसाठी

(4) सृजनशीलतेसाठी

**139.** लेखकाने महावस्त्राची उपमा कोणाला दिली आहे?

(1) वस्त्रप्रावरणाला

(2) जीवनाच्या उन्नत अवस्थेला

(3) सौंदर्य दृष्टीला

(4) संस्कृतीला

**140.** पुढील शब्दांपैकी विशेषण नसलेला शब्द शोधा.

(1) भव्यता

(2) सखोल

(3) व्याख्या

(4) सुबक

**141.** संस्कृतीच्या व्याख्येत विविधता कशामुळे आढळते?

(1) तिच्या व्यापक स्वरूपामुळे

(2) तिच्या एकसुरीपणामुळे

(3) तिच्या सृजनशीलते मुळे

(4) अमूर्त तत्वांचा शोध लाभल्या मुळे

**142.** लेखकाच्या मते समाज आणि राष्ट्र यांचे संरक्षण कोण करते?

(1) श्रेयस-प्रेयस

(2) पाप-पुण्याच्या संकल्पना

(3) संस्कृती

(4) वस्त्रप्रावरण

**143.** निसर्गाने माणसाला कोणती देणगी दिली आहे?

(1) केलेल्या चुकांची पुनरावृत्ती करण्याची

(2) अमूर्त तत्त्वांचा शोध घेण्याची

(3) भूतकाळाच्या विस्मरणाची

(4) मानसिक सुख प्राप्त करण्याची

***सूचना :*** पुढील उतारा वाचा आणि प्रश्न क्रमांक **144** ते **150** या साठी योग्य पर्यायची निवड करा.

सारी पांगापांग झाली. सारे गेले, पण एक गेले नाही. माईंचे फुलवेड! हे वेड नसते तर माई वेड्या झाल्या असत्या. मााई लहानपणपासूनच फुलवेड्या होत्या. बालपणी माईच्या बाळडोळ्यांना आधी ओळख झाली असेल, पटली असेल, तर ती फुलांची. लहानपणी माई तासन् तास आपल्या बागेत हिंडायच्या, फुलांशी खेळायच्या, फुलांशी बोलांयच्या. हे फुलवेड घेऊनच माई सासरी गेल्या. घर भरलेले होते, पण माईंच लक्ष्य घराबाहेर बागेत होते. काकाजी पुढच्या बागेत खपत. माईंनी आपल्यासाठी मागच्या बाजूचा एक कोपरा मागून घेतला आणि त्यात आपली स्वतःची बाग थाटली. त्यांची आणि काकाजींची चढाओढ सुरू झाली. काकाजींच्या गुलाबापेक्षाही आपले गुलाब टपोरे झाले पाहिजेत म्हणून माईंची धडपड चाले. माईंनी लांबलांबून गुलाबाची रोपे आणली. कधी हे, कधी ते, असे खताचे प्रयोग केले. आपल्या गुलाबाला पांढरेशुभ्र, टपोरे फूल येताच माईंना ब्रह्मानंद झाला. ज्याला-त्याला आपल्या बागेत नेऊन त्या आपले फूल दाखवीत. लाडकी सून. साऱ्यांनी माईंचे कौतुक केले. ते पहिले फूल तोडल्यावर माईंनी ''बघा माझा गुलाब'' म्हणून ज्याला-त्याला आपले फूल दाखविले, इतकेच नव्हे. तर एक गंभीर प्रकृतीच्या, निर्विकार, निर्गुण डॉक्टरीणबाई वाड्यात आल्या हेत्या ..... . माईंनी त्यांच्या नाकाशी फूल नेले.

माईंना सारीच फुले आवडत. त्यातल्या त्यात गुलाब हा त्यांचा विशेष आवडता. गुलाबांतही पांढरा आणि फिकट गुलाबी. गुलाबा-खालोखाल शेवंती, मोगरा आणि जुई. विलायती फुलांत डेलिया आणि ग्लॅडिओलस. माईंनी पाचपन्नास प्रकारचे

डेलिये आणले, त्यांची लागवड केली. चांगली मशागत केली आणि त्यातून एकदोन जातींची निवड केली. माईंचे डेलिये इतके डेरेदार आणि डौलदार असत की त्यांच्याकडे पाहातच बसावे. माईंना मारव्याची फार आवड. त्या मारव्याचा सारखा प्रचार करीत. त्या म्हणत, फुलझाडाला फूल येईपर्यंत तुम्हाला धीर निघत नसेल तर मारवा लावा. आठपंधरा दिवसांत जीव धरील. छानदार मरवा तुम्हाला वास घ्यायला मिळेल.

वाडा विकला तेव्हा माई रात्रभर रडल्या, पण सकाळी आपल्या बागेकडे पाहून स्वस्थ झाल्या. आता त्यांची बाग म्हणजे फुलझाडांच्या चार कुंड्या होत्या. त्या कुंड्यांना त्या जिवापलिकडे जपत. त्या जिकडे जात तिकडे त्यांच्या बरोबर त्यांची ही छोटी बागही जात असे. माईंच्या पायाला भोवरा असे. त्या कधी महिना-दीड-महिना एका ठिकाणी स्वस्थ राहिल्या नाहीत. कधी पुण्याला, कधी नाशकाला. तर कधी नगरला. बरोबर नेहमी त्या चार कुंड्या. पुण्यास लेकीकडे आल्या म्हणजे आधी आपल्या कुंड्यांची सोय लावायच्या, मग स्वतःची. सकाळी उठल्या की माझ्या बागेत येत. आपल्या जुन्या ओळखीच्या झाडांची, रोपांची भेट घेत, माळ्याला त्याची ख्याली-खुशाली विचारीत, आणि मगच घरात येऊन मला भेटत.

**144.** माईंना कोणत्या गोष्टीमुळे ब्रह्मानंद झाला?

(1) वाडा विकला गेल्यामुळे

(2) साऱ्यांनी कौतुक केल्यामुळे

(3) भरलेल घर असलेले सासर मिळाल्या मुळे

(4) गुलाबाला फूल उमलल्यामुळे

**145.** 'निर्विकार' शब्दाच समानार्थी नसलेला शब्द शोधा

(1) विकार रहित

(2) शांत

(3) अचल

(4) चंचल

**146.** माईंना गुलाबाच्या फुलानंतर कोणते देशी फूल आवडत असे?

(1) जुई

(2) डेलिया

(3) मरवा

(4) ग्लॅडिओलस

**147.** 'चढाओढ' या शब्दातून लेखकाला कोणता अर्थ अभिप्रेत नाही?

(1) चुरस

(2) ईर्षा

(3) लालसा

(4) स्पर्धा

**148.** 'पांगणे' हे काय आहे?

(1) क्रियापद

(2) विशेषण

(3) सर्वनाम

(4) विशेषनाम

**149.** माई सासरी काय घेऊन गेल्या?

(1) फुलवेड

(2) स्वतःची बाग

(3) पायचा भोवरा

(4) फुल झाडे

**150.** माई कोणत्या गोष्टीचा सारखा प्रचार करीत असत?

(1) डौलदार डेलियाचा

(2) मरव्याच्या फुलाचा

(3) गुलाबाच्या वासाचा

(4) फुलांच्या कुंड्यांचा

***खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :***

1. वेगवेगळ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी प्रश्नपत्रिकेत योग्य ठिकाणी सूचना देण्यात आल्या आहेत. प्रश्नांची उत्तरे देण्याअगोदर त्या सूचना काळजीपूर्वक वाचा.
2. प्रत्येक प्रश्नासाठी दिलेल्या **चार** पर्यायांपैकी बरोबर उत्तरासाठी OMR उत्तर-पत्रिकेच्या **बाजू-2** वर केवळ एकच वर्तुळ काळे किंवा निळे बॉलपॉइन्ट पेन ने संपूर्ण भरा. एकदा उत्तराचे वर्तुळ भरल्यावर ते बदलता येणार नाही.
3. परीक्षार्थींनी उत्तर-पत्रिकेला कोठेही घडी पडणार नाही किंवा त्यावर कुठलीही असंबद्ध खूण केली जाणार नाही याची काळजी घ्यावी. परीक्षार्थींनी आपला अनुक्रमांक उत्तर-पत्रिकेत नेमून दिलेल्या जागेव्यतिरिक्त अन्यत्र लिहू नये.
4. चाचणी-पुस्तिका आणि उत्तर-पत्रिका काळजीपूर्वक हाताळा. कारण कोणत्याही परिस्थितीत (चाचणी-पुस्तिकेचा कोड अथवा क्रमांक आणि उत्तर-पत्रिकेचा कोड अथवा क्रमांक यांमधील विसंगती वगळता) दुसरा संच पुरविला जाणार नाही.
5. चाचणी-पुस्तिका/उत्तर-पत्रिका यांवर दिलेले कोड आणि क्रमांक परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर बरोबर लिहावा.
6. OMR उत्तर-पत्रिकेतील माहितीचे वाचन संगणकाच्या मदतीने केले जाते. त्यामुळे कोणतीही माहिती अपुरी किंवा प्रवेशपत्रकातील माहितीपेक्षा वेगळी देऊ नये.
7. परीक्षार्थींना कोणतीही पाठ्यपुस्तकाची सामग्री, मुद्रित अथवा लिखित, कागदाचे तुकडे, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण अथवा प्रवेशपत्रव्यतिरिक्त अन्य कोणतीही सामग्री परीक्षेच्या सभा गृहात/खोली मध्ये आणण्याची परवानगी नाही.
8. मोबाइल फोन, तार-रहित संभाषण यंत्र, (बंद केलेल्या अवस्थेतही) किंवा इतर निषिद्ध वस्तू परीक्षाकेन्द्रात आणू नये. तसे केल्याचे आढळल्यास त्याला 'अनफेअर मीन्स' गृहीत धरले जाईल आणि त्यावर परीक्षा निरस्त करणे या सकट इतर कार्यवाही करण्यात येईल.
9. प्रत्येक परीक्षार्थींने त्याचे/तिचे प्रवेशपत्र पर्यवेक्षकांनी मागितल्यावर त्यांना दाखवली पाहिजे.
10. पर्यवेक्षक अथवा अधीक्षक यांच्या खास परवानगीशिवाय कोणत्याही परीक्षार्थींला आपली जागा सोडता येणार नाही.
11. कामावर असलेल्या पर्यवेक्षकांकडे उत्तर-पत्रिका दिल्याखेरीज आणि उपस्थिती पृष्ठावर दोनदा सही केल्या खेरीज परीक्षार्थींनी परीक्षागृह सोडू नये. ज्या परीक्षार्थींनी उपस्थिती पृष्ठावर दुसऱ्यांदा सही केलेली नसेल त्यांची उत्तर-पत्रिका पर्यवेक्षकाकडे दिली गेलेली नाही, असे समजले जाईल आणि ती बाब अनुचित साधनाची बाब मानली जाईल.
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तसंचालित गणितयंत्रा (Calculator) चा उपयोग निषिद्ध आहे.
13. परीक्षागृहातील वर्तणुकीबाबत परीक्षार्थींना बोर्डाच्या नियमांचे पालन करावे लागेल. अनुचित साधनाच्या सर्व बाबींचा निर्णय बोर्डाच्या नियमांनुसार केला जाईल.
14. चाचणी-पुस्तिका आणि उत्तर-पत्रिका यांचा कोणताही भाग कोणत्याही परिस्थितीत सुटा करू नये.
15. **चाचणी पूर्ण झाल्यानंतर परीक्षार्थींनी उत्तर-पत्रिका परीक्षागृहातील पर्यवेक्षकाकडे दिली पाहिजे.** ***चाचणी-पुस्तिका परीक्षार्थी आपल्याबरोबर घेऊन जाऊ शकतात.***

**निम्नलिखित निर्देशों को ध्यान से पढ़ें :**

1. जिस प्रकार से विभिन्न प्रश्नों के उत्तर दिए जाने हैं उसका वर्णन परीक्षा पुस्तिका में किया गया है, जिसे आप प्रश्नों का उत्तर देने से पहले ध्यान से पढ़ लें।
2. प्रत्येक प्रश्न के लिए दिए गए **चार** विकल्पों में से सही उत्तर के लिए OMR उत्तर-पत्र के **पृष्ठ-2** पर केवल एक वृत्त को ही पूरी तरह **काले/नीले बॉलपॉइंट पेन** से भरें। एक बार उत्तर अंकित करने के बाद उसे बदला नहीं जा सकता है।
3. परीक्षार्थी सुनिश्चित करें कि इस उत्तर-पत्र को मोड़ा न जाए एवं उस पर कोई अन्य निशान न लगाएँ। परीक्षार्थी अपना अनुक्रमांक उत्तर-पत्र में निर्धारित स्थान के अतिरिक्त अन्यत्र न लिखें।
4. परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र का ध्यानपूर्वक प्रयोग करें, क्योंकि किसी भी परिस्थिति में (केवल परीक्षा पुस्तिका एवं उत्तर-पत्र के संकेत या संख्या में भिन्नता की स्थिति को छोड़कर) दूसरी परीक्षा पुस्तिका उपलब्ध नहीं करायी जाएगी।
5. परीक्षा पुस्तिका/उत्तर-पत्र में दिए गए परीक्षा पुस्तिका संकेत व संख्या को परीक्षार्थी सही तरीके से हाजिरी-पत्र में लिखें।
6. OMR उत्तर-पत्र में कोडित जानकारी को एक मशीन पढ़ेगी। इसलिए कोई भी सूचना अधूरी न छोड़ें और यह प्रवेश-पत्र में दी गई सूचना से भिन्न नहीं होनी चाहिए।
7. परीक्षार्थी द्वारा परीक्षा हॉल/कक्ष में प्रवेश-पत्र के सिवाय किसी प्रकार की पाठ्यसामग्री, मुद्रित या हस्तलिखित, कागज की पर्चियाँ, पेजर, मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक उपकरण या किसी अन्य प्रकार की सामग्री को ले जाने या उपयोग करने की अनुमति नहीं है।
8. मोबाइल फोन, बेतार संचार युक्तियाँ (स्विच ऑफ अवस्था में भी) और अन्य प्रतिबंधित वस्तुएँ परीक्षा हॉल/कक्ष में नहीं लाई जानी चाहिए। इस सूचना का पालन न होने पर इसे परीक्षा में अनुचित साधनों का प्रयोग माना जाएगा और उनके विरुद्ध कार्यवाही की जाएगी, परीक्षा रद्द करने सहित।
9. पूछे जाने पर प्रत्येक परीक्षार्थी, निरीक्षक को अपना प्रवेश-पत्र दिखाएँ।
10. केन्द्र अधीक्षक या निरीक्षक की विशेष अनुमति के बिना कोई परीक्षार्थी अपना स्थान न छोड़ें।
11. कार्यरत निरीक्षक को अपना उत्तर-पत्र दिए बिना एवं हाजिरी-पत्र पर दुबारा हस्ताक्षर किए बिना परीक्षार्थी परीक्षा हॉल/कक्ष नहीं छोड़ेंगे। यदि किसी परीक्षार्थी ने दूसरी बार हाजिरी-पत्र पर हस्ताक्षर नहीं किए, तो यह माना जाएगा कि उसने उत्तर-पत्र नहीं लौटाया है और यह अनुचित साधन का मामला माना जाएगा। **परीक्षार्थी अपने बाएँ हाथ के अँगूठे का निशान हाजिरी-पत्र में दिए गए स्थान पर अवश्य लगाएँ।**
12. इलेक्ट्रॉनिक/हस्तचालित परिकलक का उपयोग वर्जित है।
13. परीक्षा हॉल/कक्ष में आचरण के लिए परीक्षार्थी बोर्ड के सभी नियमों एवं विनियमों द्वारा नियमित हैं। अनुचित साधनों के सभी मामलों का फैसला बोर्ड के नियमों एवं विनियमों के अनुसार होगा।
14. किसी हालत में परीक्षा पुस्तिका और उत्तर-पत्र का कोई भाग अलग न करें।
15. **परीक्षा सम्पन्न होने पर, परीक्षार्थी हॉल/कक्ष छोड़ने से पूर्व उत्तर-पत्र निरीक्षक को अवश्य सौंप दें।** ***परीक्षार्थी अपने साथ इस परीक्षा पुस्तिका को ले जा सकते हैं।***

**READ THE FOLLOWING INSTRUCTIONS CAREFULLY :**

1. The manner in which the different questions are to be answered has been explained in the Test Booklet which you should read carefully before actually answering the questions.
2. Out of the **four** alternatives for each question, only one circle for the correct answer is to be darkened completely with **Black/Blue Ballpoint Pen** on **Side-2** of the OMR Answer Sheet. The answer once marked is not liable to be changed.
3. The candidates should ensure that the Answer Sheet is not folded. Do not make any stray marks on the Answer Sheet. Do not write your Roll No. anywhere else except in the specified space in the Answer Sheet.
4. Handle the Test Booklet and Answer Sheet with care, as under no circumstances (except for discrepancy in Test Booklet Code or Number and Answer Sheet Code or Number), another set will be provided.
5. The candidates will write the correct Test Booklet Code and Number as given in the Test Booklet/Answer Sheet in the Attendance Sheet.
6. A machine will read the coded information in the OMR Answer Sheet. Hence, no information should be left incomplete and it should not be different from the information given in the Admit Card.
7. Candidates are not allowed to carry any textual material, printed or written, bits of papers, pager, mobile phone, electronic device or any other material except the Admit Card inside the Examination Hall/Room.
8. Mobile phones, wireless communication devices (even in switched off mode) and the other banned items should not be brought in the Examination Halls/Rooms. Failing to comply with this instruction, it will be considered as using unfair means in the examination and action will be taken against them including cancellation of examination.
9. Each candidate must show on demand his/her Admit Card to the Invigilator.
10. No candidate, without special permission of the Centre Superintendent or Invigilator, should leave his/her seat.
11. The candidates should not leave the Examination Hall/Room without handing over their Answer Sheet to the Invigilator on duty and sign the Attendance Sheet twice. Cases where a candidate has not signed the Attendance Sheet second time will be deemed not to have handed over the Answer Sheet and dealt with as an unfair means case. **The candidates are also required to put their left-hand THUMB impression in the space provided in the Attendance Sheet.**
12. Use of Electronic/Manual Calculator is prohibited.
13. The candidates are governed by all Rules and Regulations of the Board with regard to their conduct in the Examination Hall/Room. All cases of unfair means will be dealt with as per Rules and Regulations of the Board.
14. No part of the Test Booklet and Answer Sheet shall be detached under any circumstances.
15. **On completion of the test, the candidate must hand over the Answer Sheet to the Invigilator in the Hall/Room.** ***The candidates are allowed to take away this Test Booklet with them.***